**CNR NO- MHSO060020502017**

नियमित दिवाणी दावा क्र.११२/२०१७

आय.ए. क्र. ३/२०२२

योगीता भोसले

वि.

रामचंद्र भोसले व इतर.

## नि.६२ वरील आदेश

## (घोषित दि. १३/०९/२०२२)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आलेला असून असे नमूद करण्यात आले की, वादी व तिच्या पतीचे लग्नाचे वेळी फोटो काढण्यात आले होते ज्यापैकी दोन फोटो मोहोळ येथील न्यायालयामध्ये चौकशी अर्ज क्र.२०४/२०१४ मध्ये दाखल केले होते. ते फोटो वादीने तेथील न्यायालयातून प्राप्त करुन घेतलेले आहेत सबब सदरचे फोटो प्रस्तुत प्रकरणात दाखल करण्याची परवानगी मिळणेची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादीने प्रस्तुत अर्जास विरोध करुन असे नमूद केले की, वादीने खोटया मजकूराचा अर्ज दाखल केला असून फोटोच्या प्रती प्रतिवादींना दिलेल्या नाहीत सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] वादीने सरसनिरस मानाने मयत निलेश उर्फ सतिश भोसले याच्या मिळकतीमध्ये वाटप होवून मिळणेकरीता दावा दाखल केला असून तीने निलेश उर्फ सतिश भोसले याची पत्नी असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी सदरचा विवाह स्पष्टपणे नाकारलेला असून वादी मयत निलेश उर्फ सतिश याची पत्नी नसल्याचा बचाव घेतला आहे. त्या अनुषंगाने मुद्दा क्र. १ नि.क्र. ३७ वर काढण्यात आलेला आहे व तो मुद्दा सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. वादीतर्फे दोन फोटो पटलावर दाखल करण्यात आलेले असून असे नमूद केले की, हे फोटो मोहोळ येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात प्रलंबित असलेल्या चौकशी अर्ज क्र.२०४/२०१४ मध्ये दाखल केले होते तेथून ते फोटो प्राप्त करुन या न्यायालयात दाखल केलेले आहेत. वादीला सदरचे फोटो दाखल करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींवर अन्याय होणार

नाही उलटपक्षी सदरचे फोटो दाखल करण्यास परवानगी न दिल्यास वादी न्यायापासून वंचित राहू शकते. सबब वादीला फोटो दाखल करण्याची परवानगी देणे संयुक्तीक असल्याचे माझे मत झाले आहे करीत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येतो व वादीला यादी नि.क्र. ६३ अनुसार फोटो दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

AMIT ASHOKRAO KHANDALE Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE Date: 2022.09.13 17:16:45 +0530

**दि.१३/०९/२०२२.** **(अमित अ.खंडाळे)**

**२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**

**पंढरपुर.**

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 13.09.2022 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 13.09.2022 |
| Judgment/Order uploaded | | |
| **on** | **:** | 13.09.2022 |